## ❖ वेडयावाकडया दातांची समस्या ः-

कोणत्याही व्यक्तिला सर्वात पहिल्यांदा जेव्ह अपण पाहतो तेव्ह प्रामुख्याने त्या व्यक्तिचा चेहराच आपल्या लक्षात राहतो .चेह यामध्ये ठहकपणे उठून दिसतात त्या व्यक्तिचे केस डोळे नाक आणि दात या चार घटकापैकी केस डोळे नाक हे तिन्ही घटक सुंदर असले आणि दात मात्र वेडेवाकडे वा फारच पुढे असले तर मात्र बाकी सर्व सौंदर्यघटक हजर असूनही वेडेवाकडया दातांमुळे चेह याला कुरूपता येते .

शिवाय दात वेडेवाकडे वा फारच पुढे असल्यामुळे दातांना वा हिरडयांना सतत इजा होत राहते .दात निट स्वच्छ साफ करता येत नाहीत् .त्यामुळे दातात जास्त प्रमनात कीटण साठू लागते .हिरडयाचे आजार बळावतात आणि दात किडण्याचे प्रमाण वाढीस लागते .पर्यायाने दातांचे आरोग्य खालावते .

## ❖ दात वेडेवाकडे का येतात

१ . अनुवंशिकता ः-
२ . अयोग्य सवयी ः-

## ❖ अनुवंशिकता ः-

दात वेडेवाकडे पुढे उगवण्याचे अनुवंशिकता एक प्रमुख कारण आहे पालकांपैकी एकाचा लहान जबडा व दुस-याचे मोठे दात जर मुलांच्यात उतरले तर लहान जबडयामध्ये मोठया आकाराचे दात व्यवस्थित सामावले जात नाहीत आणी दातां नीट रचनेत उगवायला पुरेशी जागा न मिळाल्यामुळे दात पुढे येतात .

Indian Dental Association

## ❖ अयोग्य सवयी ः-

चांगले एका सरळ रचनेत उगवू शकणारे दातही वेडेवाकडे उगवण्याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे लहान मुलांना लागणा-या अयोग्य सवयी .

उदा ः- अंगठा, बोट चोखणे पेन, पेन्सिल, शर्टची कॉलर इ . चोखणे .

पडलेल्या दुधाच्या दाताच्या जागी जिभेने सतत खेळून उगवना-या पक्कया दातांची रचना व दिशा बदलते झोपेत तोंड उघडे ठेऊन झोपणे .